# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली  **P.S.(ठाणे):** मिरज ग्रामीण

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0374  **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**23/07/2026 15:50

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार  **Date From (दिंनाक पासून):** 17/06/2026
**Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिंनाक पर्यंत):** 17/06/2026
**Time From (वेळेपासून):** 12:32 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:41 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 23/07/2026  **Time (वेळ):** 15:16 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 027
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 23/07/2026 15:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 11 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** ग्रामपंचायत कार्यालय,गुंडेवाडी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** यास्मीन शरीफ इनामदार

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अन्टी करप्शन ब्युरो, सांगली,सांगली,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अन्टी करप्शन ब्युरो, सांगली,सांगली,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9527904700

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | वर्षा शंकर कदम | | | 1. खटाव ,मिरज,मिरज ग्रामीण , सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | शरद दत्तात्रय चौगुले | | | 1. गुंडेवाडी ,मिरज ,मिरज ग्रामीण , सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब दि. 23.07.2026

मी श्रीमती यास्मीन इनामदार, वय - 40 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, मो.नं 9527904700.

सरकारतर्फे फियादी होवून देते फियादी जबाब की, मी पोलीस उप अधीक्षक या पदावर अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे कार्यरत आहे.

दि. 16.06.2026 रोजी तक्रारदार श्री. अनिकेत प्रकाश सदामते, रा.सांगली यांनी आम्हास संपर्क करून त्यांची ग्रामपंचायत गुंडेवाडी येथील ग्रामविकास अधिकारी श्रीमती कदम व चौगुले यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार कळविली. त्यावेळी मी तक्रारदार यांना दि.17.06.2026 रोजी सकाळी 11.00 वाजता पथकास सह तानंग फाटा येथे येत असलेचे सांगून सदर ठिकाणी हजर राहणेच्या व सदर तक्रारीबाबत गोपनियता राखणेच्या सुचना दिल्या.

दि.17.06.2026 रोजी आम्ही मा. आयुक्त सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांना वर्ग-3 चे एक महिला कर्मचारी व मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग मिरज यांना वर्ग-3 चे एक पुरुष कर्मचारी यांची पंचसेवा उपलब्ध होणेबाबत पत्रव्यवहार करून दोन्ही पंचांचे संपर्क क्रमांक प्राप्त करून त्यांना 10.30 वाजता एसीबी कार्यालयात हजर राहणेच्या सुचना दिल्या. आम्ही दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंच इकडील कार्यालयात 10.30 वाजता आमचे समक्ष हजर झाले. त्यांनी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास संमती दिली.

त्यानंतर मी, दोन्ही पंच, व ला.प्र.वि.पथक पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे आवश्यक साहित्य सह शासकीय वाहन महिंद्रा बुलेरो न्युओ क्र. एमएच-10-ईव्ही-4685 मधून कार्यालयातून 10.40 वाजता रवाना होवून स्टेशन चौक, कुपवाड, एमआयडीसी मार्गे, तानंग फाटा येथे रोडकडेला सुरक्षित ठिकाणी 11.15 वाजणेचे सुमारास दाखल झालो.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. सदामते यांना संपर्क करून आमचे वाहनाचे वर्णन सांगुन आम्ही थांबले ठिकाणी येण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. सदामते हे त्यांचेकडील मो.सा. क्र. एमएच-10-बीएस-7716 वरून आमचे समक्ष हजर झालेनंतर त्यांना मी आमचेकडील वाहनात बसवले. त्यानंतर मी, तक्रारदार श्री. सदामते यांना दिले सुचनेप्रमाणे त्यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार थोडक्यात पंचा समक्ष कथन केली. त्यामध्ये तक्रारदार यांनी ग्रामपंचायत गुंडेवाडी येथे लागणारे आवश्यक साहित्य पुरविलेचे प्रलंबित बिल मंजूर करण्यासाठी गुंडेवाडी ग्रामपंचायत येथील ग्रामविकास अधिकारी श्रीमती कदम व कार्यालयात काम करणारा चौगुले यांनी त्यांचेकडे 1,28,000/- रूपये लाचेची मागणी केली आहे वगैरे तक्रार सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. सदामते यांची दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार यांची एकमेकात ओळख करुन दिली. त्यानंतर मी सदर कारवाईसाठी श्रीमती सोनाली विजय जाधव यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री.आकाराम सत्यपा चौगुले यांनी पंच नं. 2 म्हणुन काम करण्याचे निश्चीत केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. सदामते यांना ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देवून त्यांना त्यांचा तक्रारी अर्ज देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. सदामते यांनी त्यांचा हस्तलिखीत लाच मागणीचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला. त्यावेळी मी सदर तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. सदामते यांचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचांनी तक्रारी अर्ज वाचून तक्रारदार यांनी तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याचे असल्याची खात्री करून तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करुन लोकसेविका श्रीमती कदम ग्रामविकास अधिकारी व चौगुले यांचेविरूध्द लाचलुचपतीची सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. सदामते व पंच क्र.1 सोनाली जाधव यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या.
त्यानंतर मी 12.06 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंच नं.1 यांना दिले सुचनांची उजळणी करून दिली.
त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 12.32 वा सुरु करुन तो तक्रारदार यांना त्यांचे गळयामध्ये लेसच्या सहाय्याने अडकवून त्यांना लोकसेविका श्रीमती कदम, ग्रामविकास अधिकारी व चौगुले यांची ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी येथे भेट घेण्यास रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. सदामते हे त्यांचेकडील होंडा शाईन क्रमांक मो.सा. क्र. एमएच-10-बीएस-7716 वरून पंच नं.1 सोनाली जाधव यांचेसह रवाना झाले.
त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. सदामते व पंच नं.1 सोनाली जाधव असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 13.41 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला. त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. सोनाली जाधव यांना, लोकसेविका श्रीमती कदम व चौगुले यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून रवाना होवून मालगाव, गं्ुडेवाडी गावामध्ये ग्रामपंचायत कार्यालय गं्ुडेवाडी येथे दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार यांनी कार्यालयातील एका कर्मचारी यांची भेट घेवून त्याचेशी चर्चा करू लागले. त्यावेळी सदर कर्मचारी यांनी तक्रारदार यांना माझेबाबत विचारले असता तक्रारदार यांनी त्यांना "दिदी" असल्याचे सांगितले. तक्रारदार व कर्मचारी यांचे बोलणेवरून कर्मचारी हे लोकसेवक "चौगुले" असल्याचे माझी खात्री झाली. त्यानंतर तक्रारदार व चौगुले हे बिला संदर्भात चर्चा करू लागले. त्यावेळी तक्रारदार यांनी चौगुले यांना "पेमेंटच जरा प्रॉब्लेम आला.... लईच आडचण याय लागल... म्हणुन जरा मॅडमना बोलायच का डायरेक्ट?" असे विचारले असता चौगुले यांनी "त्या दिवशी बोलल्या... तुला सांगीतल... काय बोलायच आता.... मी मध्यस्ती करून ....आणी बोलले होते....तुम्हाला बोललोय कि... मी सगळ सांगीतलय कि त्या दिवशी" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना "अ ॅडजेस्ट होईना झालय पेमेंट.... त्यामुळ मी आणी परत आलोय...." असे म्हणाले. त्यावर चौगुले यांनी " बघ आता ह्यातल एक आठ्ठाविस हजार राहिलेत ते आता" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "बर आता किती द्यायचे?" असे विचारले असता चौगुले यांनी "एक" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "एक लाख रुपये?" असे म्हणाले असता चौगुले यांन "आठ्ठाविस हजार रूपये तुम्हाला कमी केलेत" असे म्हणून तक्रारदार यांचेकडे 1,00,000/- रूपयांची मागणी केली.
त्यानंतर तक्रारदार यांनी पुन्हा चौगुले यांना रक्कम कमी करणेची विंनती केली असता चौगुले यांनी "मी बोललो कि तुम्हाला आता तेवढ आठ्ठाविस हजार अ ॅडजेस्ट आता काय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना "मॅडमची भेट घालून देवून त्यांचेशी बोलणे करून देणेची विंनती केली असता चौगुले यांनी मॅडमच्या पुढे काही लोक असलेचे सांगितले.
त्यानंतर तक्रारदार यांनी चौगुले यांना " मला काय वाटल त्या दिवशी तुम्हाला एक लाख रूपये दिल त्यावर तुम्ही करशीला वाटल" असे म्हणून पुर्वी 1 लाख रूपये दिले रक्कमेबाबत विचारले असता, चौगुले यांन "तेवढयावर होत असत तर पेमेंट मी आडकुन बसलोय.... पाठीमाग मला विणाकारण शिव्या खायची पाळी आली" असे म्हणाले. त्यानंतर चौगुले यांनी "मॅडम दोन मिनट... दोन मिनट आलिकड येताय" असे म्हणून श्रीमती कदम ग्रामविकास अधिकारी यांना बोलावून घेतले. त्यावेळी ग्रामविकास अधिकारी कदम हया चौगुले व तक्रारदार यांचेजवळ येवून तक्रारदार यांना "काय काय झाले?" असे विचारले. त्यावर तक्रारदार यांनी "काय तेच की" असे म्हणाले. त्यावर श्रीमती कदम यांनी "सांगितलय ना तुमाला एकदा" असे म्हणाल्या. त्यावर तक्रारदार यांनी "सांगितलय मॅडम, काय झालय जरा पेमेंटचा प्रॉब्लेम झालाय" असे म्हणाले. त्यावर श्रीमती कदम यांनी तक्रारदार यांना "तुमी आता काय करणार ते सांगा, का नायच, परवा दिवशी बोललेत, कस करायच" असे म्हणाल्या. त्यावर चौगुले यांनी तक्रारदार यांना "परवा दिवशी बोललेत त्याप्रमाण करा अ ॅडजस्ट" असे विचारले ं. त्यावर तक्रारदार यांनी कदम व चौगुले यांना "वरचे किती कमी केले?" असे विचारले. त्यावर श्रीमती कदम यांनी चौगुले यांना "किती कमी केले, तीस का अठ्ठावीस?" असे विचारले. त्यावर चौगुले यांनी "अठ्ठावीस" असे म्हणाले. त्यावर कदम यांनी "तीस झाले नव्ह, एवढ कस कमी" असे म्हणाल्या. त्यावर तक्रारदार यांनी "अठ्ठावीस हजार" असे म्हणाले.
त्यानंतर चौगुले यांनी तक्रारदार यांना "अठ्ठावीस हजार कमी कराय लागलोय" असे म्हणाले. त्यावर श्रीमती कदम यांनी तक्रारदार यांना "हे सगळ द्या..... संध्याकाळ पर्यंत बील सोडायची व्यवस्था करतो तुमची" असे म्हणाल्या.

त्यावर तक्रारदार यांनी श्रीमती कदम यांना "किती द्यायचे सांगा, सांगा की मॅडम" असे विचारले असता श्रीमती कदम यांनी "सगळच द्यायचे..... काय हाय ते तुमी सगळ द्या" असे म्हणाल्या.
त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांना रक्कम सांगणेची विंनती केली. त्यावेळी श्रीमती कदम यांनी चौगुले यांना "सांगा त्यांना ही काढा की.....गुणिले पंचवीस करा की.... किती होते अमाऊंट" असे म्हणून कॅलक्युलेशन करायला सांगितले. त्यावेळी चौगुले यांनी त्यांचे मोबाईलवर कॅलक्युलेशन करून श्रीमती कदम यांना मोाबईल दाखवून "अठ्ठाविस हजार लेस केल ना एवढ राहतय" असे म्हणाले. त्यावर श्रीमती कदम यांनी "हा तेवढी गेली, एक झालय , एक राहिल ना मग" असे विचारले. त्यावर चौगुले यांनी "हा एक राहिले" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी श्रीमती कदम यांना "किती?" असे विचारले असता श्रीमती कदम यांनी "एक" असे म्हणून तक्रारदार यांचेकडे 1,00,000 /- रूपये लाचेची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी "एक लाख" असे म्हणाले असता श्रीमती कदम यांनी "मग किती म्हणायलाय" असे म्हणाल्या. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना एवढी रक्कमेची जुळणी होत नसलेचे सांगून रक्कम कमी करणेची विंनती करून "आगोदर एक लाख रूपये दिल्यात मॅडम, सरांना एक लाख" असे म्हणाले. त्यावर चौगुले यांनी तक्रारदार यांना " पेमेंट पण दिलय ओ" असे म्हणाले. व श्रीमती कदम यांनी " आमी पण दिलच की मग... आठ लाख रूपये दिलेत तुमाला..... तुमाला दुसर काम पायजे आसल तर तुमी करा.... सोळा लाखाच काम हाय ते....तुमी जर व्यवस्थित केला तर तुमच नांव सुचवते त्यांना " असे म्हणाल्या. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना पुन्हा रक्कम कमी करणेची विंनती केली. त्यावर चौगुले यांनी तक्रारदार यांना "एक नुसत हुईना झालय व्हय.....पाच हजार रूपये कमी दया" असे म्हणून 1 लाख रूपये रक्कमेतील 5 हजार रूपये कमी करणेस सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी "पाच हजार कमी मजे...टोटल किती द्यायच?" असे विचारले असता, श्रीमती कदम यांनी "तुमाला येत नाय काय गणित करायला सांगा बर तुमी हा, करा कॅलक्युलेशन, आमी पाच कमी केले तुमाला" असे म्हणाल्या. त्यावर तक्रारदार यांनी एवढी रक्कम अॅडजेस्ट होत नसल्याचे सांगितले. त्यावर श्रीमती कदम यांनी "किती वेळा सांगाय लागलाय, यायच ना अॅडजेस्ट करून, आठ दिवस गेले आस का करताय तुमी....कुणाकडन तर घेतल आसत एक लाख" असे म्हणाल्या. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना "मॅडम टोटल एक लाख रूपये द्यायचे त्यातले पाच हजार तुमी कमी केले" असे विचारले असता श्रीमती कदम यांनी "ते अठ्ठवीस प्लस हे पाच" कमी केले असल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी श्रीमती कदम व चौगुले यांना रक्कमेची जुळणी करून येत असल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार व मी असे ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी येथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो. उर्वरीत वर्दीजबाब

गुरनं ता. 23.07.2026

लोकसेविका श्रीमती कदम व चौगुले यांनी तक्रारदार यांचेकडे माझे समक्ष लाच मागणी केली आहे. मी थोडया अंतरावर थांबून त्यांचे हावभाव व इशारे पाहून व त्यांचे बोलणे ऐकले आहे." वगैरे हकीकत पंच नं.1 सोनाली जाधव यांनी सांगितली.
त्यानंतर मी तक्रारदार श्री. सदामते यांना पडताळणीची हकीकत विचारली असता तक्रारदार यांनी लोकसेविका श्रीमती कदम, ग्रामविकास अधिकारी व चौगुले यांनी माझ्याकडे लाच मागणी केली त्यावेळी पंच क्र.1 सोनाली जाधव हया माझे सोबत हजर होत्या व त्यांनी आमचेतील बोलणे ऐकले व पाहिले आहे अशी हकीकत सांगितली.
त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. सदामते व लोकसेविका श्रीमती कदम, ग्रामविकास अधिकारी व चौगुले यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 002 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.
पडताळणी कारवाईमध्ये, लोकसेविका श्रीमती कदम, ग्रामविकास अधिकारी व चौगुले यांनी तक्रारदार यांनी ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी येथे लागणारे आवश्यक साहित्य पुरविलेचे बिल काढलेचे मोबदल्यात व प्रलंबित बिल काढण्यासाठी तक्रारदार यांचेकडे 1,28,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती आधी 28 हजार रूपये व नंतर आणखीन 5 हजार रूपये असे एकुण 33 हजार रूपये कमी करून 95,000/- रूपये लाचेची मागणी करून रक्कमेची जुळणी करून लागलीच रक्कम घेवून येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले.
तसेच तक्रारदार यांनी ग्रामविकास अधिकारी कदम व चौगुले यांना यापुर्वी प्रलंबित बिल काढणेसाठी 1 लाख रूपये रक्कम यापुर्वी दिले बाबत चर्चा देखील केली असून ग्रामविकास अधिकारी कदम व चौगुले यांनी ते मान्य केल्याचे निष्पन्न झाले.
त्यानंतर आम्ही लोकसेविका श्रीमती कदम, ग्रामविकास अधिकारी व चौगुले यांचेविरूध्द लागलीच ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे सर्वानुमते निश्चित केले.

मी तक्रारदार यांचेकडे लाच म्हणुन द्यावी लागणारी रक्कम उपलब्ध आहे का? असे विचारले असता, तक्रारदार यांनी रक्कमेची जुळणी करून घेवून येतो असू सांगून ते तानंग फाटा येथून निघून गेले.
त्यानंतर मी सापळा कारवाईकामी कार्यालयाकडील अंमलदार पोकॉ/अजित पाटील, पोकॉ/चंद्रकांत जाधव व पोहेकॉ/विना जाधव यांना संपर्क करून त्यांना तानंग फाटा येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे काही वेळाने सदर अंमलदार आमचे समक्ष हजर झाले.
त्यानंतर तक्रारदार श्री.सदामते 15.20 वा चे सुमारास आमचे समक्ष हजर झाले. व त्यांनी त्यांचेकडे 75,000/- रूपये उपलब्ध असल्याचे सांगून 500/- रूपये दराचे 150 चलनी नोटा असे एकुण 75,000/- रूपये आमचे व दोन्ही पंचांसमक्ष हजर केले. मी तक्रारदार यांना त्यांचेजवळील 75,000/- रूपये रक्कम कशी उपलब्ध केली याबाबत विचारले असता तक्रारदार यांनी सदर 75,000/- रूपये हे त्यांचेकडील शिल्लक रक्कमेतील असल्याचे सांगीतले.
त्यावेळी आम्ही उर्वरित 20,000/- रूपये कार्यालयाकडील डमी नोटा वापरण्याचे निश्चित केले व डमी नोटांचे 500/- रूपये दराच्या 40 नोटा असे 20,000/- रूपये आम्ही पंचासमक्ष हजर केले.
त्यानंतर मी सापळा पथकातील अंमलदार यांचेकरवी तक्रारदार यांनी हजर केलेली 75,000/- रूपये रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेतले. त्यावर मी, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी सहया केल्या.
त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.
त्यानंतर मी तक्रारदार यांनी हजर केलेल्या व कार्यालयाकडील डमी नोटांना पथकातील अंमलदार पोकॉ/जाधव यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटांचा बंडल पोकॉ/जाधव यांनी तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये लोकसेविका श्रीमती कदम व चौगुले यांनी मागणी केल्यानंतर त्यांना देणेसाठी ठेवली व आम्ही सापळापुर्व कारवाई पुर्ण केली.
त्यानंतर मी, तक्रारदार व दोन्ही पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामधील पडताळणी कारवाई वेळचे मेमरीकार्ड काढून माझे ताबेत घेवून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले.
त्यानंतर मी 15.45 वाजता सापळा कारवाईचे माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे निवेदन डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये व सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले आहे.
त्यानंतर मी तक्रारदार श्री. सदामते, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच पथकातील अंमलदार जाधव यांना तानंग फाटा येथे थांबणेचे सुचना देवून त्यांना सापळा कारवाईतून वगळण्यात आले. तसेच मी पथकातील अंमलदार पोना/चौगुले यांना त्यांचेकडील हॅन्डीकॅममध्ये लोकसेविका श्रीमती कदम व चौगुले यांचेकडून लाच रक्कम जप्तीबाबत व्हिडीओ चित्रीकरण करणेबाबतच्या सुचना दिल्या.
तसेच मी तक्रारदार यांना लोकसेविका श्रीमती कदम व चौगुले यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करणेबाबतच्या सुचना दिल्या.
त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.18 वाजता सुरू लेसच्या सहाय्याने तक्रारदार यांचे गळ्यामध्ये अडकवून लोकसेविका श्रीमती कदम व चौगुले यांची भेट घेण्याकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. सदामते व पंच नं. 1 श्री. सोनाली जाधव असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून रवाना झाले. त्यांचे पाठोपाठ मी, पंच नं. 2 चौगुले व सापळा पथक असे आवश्यकत्या साहित्यासह शासकीय वाहन महिंद्रा बुलेरो न्युओ क्र. एमएच-10-ईव्ही-4685 मधून व पोकॉ/पाटील व पोना/चौगुले त्यांचेकडील शासकीय मो.सा.क्र.एमएच-12-डब्ल्युएफ-8020 वरून रवाना झालो. पोकॉ/जाधव हे तानंग फाटा येथे सुटकेससह थांबून राहिले.
तक्रारदार सदामते व पंच नं.1 जाधव असे मोटरसायकल वरून पुढे आणि मी व सापळा पथक असे शासकिय वाहनातुन त्यांचे पाठीमागे निघालो. तक्रारदार यांनी त्यांचे मो.सा. मालगाव गावातून गुंडेवाडी गावामध्ये ग्रामपंचायत कार्यालयाचे बाजूस चौकामध्ये रोडकडेला मो.सा.पार्क केली. लागलीच आम्ही व सापळा पथक असे तक्रारदार व पंच नं.1 थांबले ठिकाण पासून काही अंतरावर थांबून राहिलो. त्यावेळी तक्रारदार हे फोनवर बोलत थांबले असलेचे दिसले. त्यानंतर तक्रारदार व पंच नं.1 जाधव हे ग्रामपंचायत कार्यालय जवळ गेलेचे दिसले. त्यावेळी आम्ही व सापळा पथक असे आजू बाजूस सापळा लावून थांबून राहिलो.
त्यानंतर तक्रारदार हे ग्रामपंचायत कार्यालयाचे बाहेर पोर्चमध्ये लोकसवक चौगुले यांचेशी बोलत असलेचे दिसले. त्यानंतर तक्रारदार व पंच नं.1 जाधव हे त्यांचेकडील मो.सा. वरून परत चौकामध्ये आले. त्यानंतर काही वेळाने चौगुले हा कार्यालयाचे बाहेर येवून त्याचेकडील मो.सा. वर बसून तक्रारदार यांचेजवळ येवून त्यांना हाताने इशारा करून त्यांचे पाठोपाठ येण्याचा इशारा केला व तो गुंडेवाडी गावातून गुंडेवाडी ते सिध्देवाडी जाणारे रोडने गेलेचा दिसला. त्यांचे पाठोपाठ तक्रारदार व पंच नं.1 जाधव मो.सा. वरून गेलेचे दिसले. लागलीच मी व सापळा पथक

असे आमचेकडील वाहनाने तक्रारदार व पंच नं.1 जाधव यांचे पाठोपाठ गेलो.
काही अंतर गेलेवर चौगुले यांनी त्याचेकडील मो.सा. थांबवली. त्यावेळी तक्रारदार व पंच नं.1 जाधव हे पुढे निघून काही अंतरावर थांबलेचे दिसले. आम्ही व सापळा पथक असे तक्रारदार यांचेपासून काही अंतरावर आमचेकडील वाहन थांबवले. त्यानंतर चौगुले हा त्याचेकडील मो.सा. वरून निघून गेला व तक्रारदार सदामते व पंच नं.1 जाधव हे परत त्यांचे कडील मो.सा वरून गुंडेवाडी ग्रामपंचायत येथे दाखल होवून ग्रामपंचायत कार्यालयामध्ये गेलेचे दिसले. लागलीच आम्ही व सापळा पथक असे तक्रारदार यांचे पाठोपाठ जावून ग्रामपंचायत कार्यालय गं ुं डेवाडीचे आजु-बाजुस सापळा लावून थांबून राहिलो.
काही वेळाने तक्रारदार व पंच नं.1 जाधव हे ग्रामपंचायती मधून बाहेर येवून पुर्वनियोजित इशारा न करता त्यांचेकडील मो.सा. वरून मालगाव रोडने रवाना झाले. लागलीच आम्ही व सापळा पथक असे आमचेकडील वाहनांने तक्रारदार यांचे पाठोपाठ रवाना होवून तानंग फाटा येथे तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 17.18 वाजता काढून घेवून बंद करून माझे ताबेत घेतला.
त्यानंतर मी पंच नं 1 श्रीमती सोनाली जाधव यांना सापळा कारवाई वेळीची हकीकत विचारली असता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगितली की, " मी, तक्रारदार श्री. सदामते असे तक्रारदार यांचेकडील मो.सा. वरून रवाना होवून गुंडेवाडी गावामध्ये ग्रामपंचायत जवळ असले चौकामध्ये दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार यांनी मो.सा. रोडसाईडला लावून त्यांनी चौगुले यांना फोन केला असता चौगुले यांनी फोन स्विकारला नाही. त्यानंतर तक्रारदार व मी असे ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी येथे गेलो. त्यावेळी ग्रामपंचायत कार्यालयाचे बाहेर पोर्चमध्ये चौगुले यांची भेट झाली. त्यावेळी चौगुले यांनी तक्रारदार यांना हाताने इशारा करून आम्हास बाहेर थांबण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार व मी असे ग्रामपंचायत कार्यालय जवळील चौकामध्ये थांबून राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांन चौगुले यांना फोन करून चौकामध्ये थांबलो असल्याचे सांगितले. त्यावेळी चौगुले यांनी तक्रारदार यांना फोन करीत असल्याचे सांगितले.
काही वेळाने चौगुले हे ग्रामपंचायत कार्यालयाचे बाहेर येवून त्यांचेकडील मो.सा.ने. आम्ही थांबलो चौकामध्ये येवून त्यांनी तक्रारदार यांना हाताने इशारा करून त्यांचे पाठोपाठ येण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार व मी असे मो.सा. ने चौगुले यांचे पाठोपाठ गुंडेवाडी ते सिध्देवाडी जाणारे रोडने गेलो. त्यावेळी चौगुले यांनी तक्रारदार यांना "मला सोडून येण्यास सांगितले" त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना "मला परत सोडायला जायचय" असे म्हणाले.
काही अंतर गेलेवर चौगुले यांनी तक्रारदार यांना हाताने इशारा करून पुढे जाण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार व मी असे चौगुले यांचे पुढे गेलो. त्यावेळी चौगुले हे वाटेत मध्ये थांबले व ते काही न बोलता त्यांचे मो.सा. वरून ते परत माघारी निघून गेले. त्यावेळी तक्रारदार सदामते यांनी चौगुले यांना फोन करून फोन स्पिकर मोडवर घेतला असता चौगुले यांनी फोन स्विकारून "अ ॅक्सीडेंट झाला आहे भावाचा....तुम्हाला नंतर फोन करतो....मी जरा परत चाललोय पाठीमागे" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "बर..मी थांबू का काय करू?" असे विचारले असता चौगुले यांनी "नको..नको..जावा तुम्ही...नंतर फोन करतो तुम्हाला" असे म्हणून फोन कट केला.
त्यानंतर तक्रारदार व मी असे पुन्हा ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी येथे गेलो. त्यावेळी तक्रारदार यांनी कार्यालयातील एका कर्मचारी यास ग्रामविकास अधिकारी कदम यांचेबाबत विचारणा केली असता त्या कार्यालयातून निघून गेले असलेचे आम्हास समजले. त्यानंतर तक्रारदार यांनी ग्रामविकास अधिकारी कदम व चौगुले यांना फोन केला असता त्यांनी तक्रारदार यांचा कॉल स्विकारला नाही. त्यानंतर तक्रारदार यांनी कायलियातील एका कर्मचारी यांचे मोबाईलवरून चौगुले यांना फोन केला असता त्यांनी तक्रारदार यांना त्यांचे भावाचा अ ॅक्सीडेंट झाला असल्याचे सांगून तक्रारदार यांना जाणेस सांगून परत फोन करीत असल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार व मी असे तेथून मो.सा. वरून रवाना होवून तानंग फाटा येथे दाखल झालो." वगैरे हकीकत पंच नं.1 सोनाली जाधव यांनी सांगितली.
त्यानंतर मी तक्रारदार श्री. अनिकेत सदामते यांना सापळा कारवाईची हकीकत विचारली असता, तक्रारदार यांनी हकीकत सांगितली की, " मी व पंच नं.1 जाधव असे रवाना होवून ग्रामपंचायत कार्यालय येथे दाखल झालो. त्यावेळी मी माझे मोबाईलवरून चौगुले यांचे मो.क्र. 9021888886 यावर फोन केला असता त्यांनी माझा कॉल स्विकारला नाही. त्यानंतर मी व पंच नं.1 जाधव असे ग्रामपंचायत कार्यालय येथे गेलो. त्यावेळी चौगुले यांची ग्रामपंचायत कार्यालयाचे पोर्चमध्ये भेट झाली. त्यावेळी चौगुले यांनी मला हाताने इशारा करून बाहेर थांबण्यास सांगितले. त्यावेळी मी व पंच नं.1 जाधव असे जवळील चौकामध्ये थांबून राहिलो. काही वेळाने मी चौगुले यांना फोन करून आम्ही चौकामध्ये थांबलो असल्याचे सांगितले. त्यावेळी चौगुले यांनी मला फोन करीत असल्याचे सांगितले. त्यानंतर काही वेळाने चौगुले हे ग्रामपंचायत कार्यालयाचे बाहेर येवून त्यांचेकडील मो.सा.ने आम्ही थांबलो चौकामध्ये आले व त्यांनी मला हाताने इशारा करून त्यांचे पाठोपाठ येण्यास सांगितले. त्यावेळी मी व पंच नं.1 जाधव असे

आमचेकडील मो.सा. ने चौगुले यांचे पाठोपाठ गुंडेवाडी ते सिध्देवाडी जाणारे रोडने गेलो. त्यावेळी चौगुले यांना मला पंच नं.1 जाधव यांना सोडून येण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना मला त्यांना परत सोडायला जायचे असल्याचे सांगितले.

काही अंतर गेलेवर चौगुले यांनी मला हाताने इशारा करून पुढे जाण्यास सांगितले. त्यावेळी मी व पंच नं.1 असे चौगुले यांचे पुढे गेलो. त्यावेळी चौगुले हे वाटेत मध्ये थांबले व ते काही न बोलता त्यांचे मो.सा. वरून ते परत माघारी निघून गेले. त्यानंतर मी चौगुले यांचे मो.क्र. 9021888886 यावर फोन केला असता त्यांनी मला त्यांचे भावाचा अॅक्सीडेंट झाला असून ते परत निघाले असलेचे सांगून मला नंतर फोन करीत असल्याचे सांगून फोन कट केला. त्यानंतर मी व पंच नं.1 जाधव असे ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी येथे जावून ग्रामविकास अधिकारी कदम यांचेबाबत विचारणा केली असता त्या कार्यालयात नसल्याचे समजले. त्यानंतर मी ग्रामविकास अधिकारी कदम यांचे मो.क्र.7028527124 व चौगुले यांचे मो.क्र. 9021888886 यावर फोन केला असता त्यांनी माझा कॉल स्विकारला नाही. त्यानंतर मी कार्यालयातील एका कर्मचारी यांचे मोबाईवरून चौगुले यांना फोन करून बोलणे केला असता त्यांनी मला त्यांचे भावाचा अॅक्सीडेंट झाला असल्याचे सांगून मला जाणेस सांगून परत फोन करीत असल्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं.1 जाधव असे तेथून रवाना होवून तानंग फाटा येथे दाखल झालो" वगैरे हकीकत तक्रारदार यांनी सांगितली.

त्यानंतर आम्ही सापळा कारवाई वेळी तक्रारदार श्री. अनिकेत सदामते व लोकसेवक चौगुले यांचेत झालेले संभाषण फाईल क्रमांक आरईसी 002 मध्ये ध्वनीमुद्रीत झाले असल्याचे व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी एैकुन खात्री केली.

झाले एकंदरीत सापळा कारवाईमध्ये, लोकसेवक श्री. चौगुले यांनी तक्रारदार श्री. अनिकेत सदामते यांचेकडून लाच रक्कम स्विकारली नसून त्यांनी तक्रारदार यांना नंतर फोन करीत असल्याचे सांगितल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही सर्वानुमते सापळा कारवाई तात्पुरती मागे घेण्याचे निश्चित केले. त्यानंतर मी तक्रारदार श्री. सदामते यांना लोकसेवक श्री. चौगुले अथवा ग्रामसेवीका श्रीमती कदम यांचा निरोप आल्यानंतर त्यांचेविरूध्द पुन्हा सापळा कारवाई आयोजित करण्याचे सर्वानुमते निश्चित केले. त्यानंतर मी तक्रारदार यांचेकडील अॅथ्रॉसिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम 95,000/- रूपये तात्पुरते माझे ताबेत घेतली.

त्यानंतर मी तक्रारदार यांना लोकसेविका श्रीमती कदम अथवा चौगुले यांचा निरोप अगर फोन आल्यास तात्काळ आम्हास संपर्क करणेबाबत सुचना देवून कारवाई बाबत गोपनियता राखणेबाबत सुचना देवून जाणेस सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार हे निघून गेले.

सदर ठिकाणी गोपनियतेचा भंग होवू नये म्हणून आम्ही एसीबी कार्यालय सांगली येथे जाणेचे निश्चित करून मी व सापळा पथक, दोन्ही पंच असे आमचेकडील वाहनाने तानंग फाटा मिरज येथून 18.30 वाजता रवाना होवून अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली कार्यालयात 19.00 वाजता दाखल झालो. त्यानंतर आम्ही दि.17.06.2026 रोजीची पडताळणी व सापळा कारवाई वेळची स्क्रिप्ट, पंचनामा व मेमरीकार्ड जप्तीची कारवाई ही एसीबी कार्यालय सांगली येथे पुर्ण केली आहे.

त्यानंतर दि. 17/06/2026 ते दि. 25/06/2026 दरम्यान तक्रारदार यांना लोकसेवक श्रीमती कदम ग्रामविकास अधिकारी व चौगुले यांनी संपर्क साधला नाही. त्यामुळे दि.25/06/2026 रोजी आम्ही तक्रारदार श्री. अनिकेत सदामते यांना संपर्क करून ग्रामविकास अधिकारी श्रीमती कदम अथवा चौगुलेयांचा फोन अगर निरोप आला आहे काय? याबाबत विचारणा केली असता, तक्रारदार श्री.अनिकेत सदामते यांनी आम्हास हकीकत सांगितली की "ग्रामविकास अधिकारी श्रीमती कदम अथवा चौगुलेयांचा पैशाबाबत कोणताही निरोप आला नाही. परंतू दरम्यानच्या काळात चौगुले यांनी माझा मित्र सरताज शेख यांचेकडून माझ्याबद्दल चौकशी केल्याचे मला समजले. ग्रामविकास अधिकारी श्रीमती कदम व चौगुले यांना माझेबाबत शंका आली असून ते आता माझ्याकडे पैशाची मागणी करून माझेकडून पैसे स्विकारणार नाहीत याची मला खात्री झालेली आहे." अशी हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. अनिकेत सदामते यांना एसीबी कार्यालय येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. अनिकेत सदामते हे एसीबी कार्यालयात हजर झाले. त्यावेळी तक्रारदार श्री.अनिकेत सदामते यांनी दोन्ही पंचासमक्ष वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. तसेच तक्रारदार यांनी ग्रामविकास अधिकारी श्रीमती कदम व चौगुले, ग्रामपंचायत कार्यालय, गुंडेवाडी यांनी आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून माझे ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी येथे लागणारे आवश्यक साहित्य पुरविलेचे बिल काढलेचे मोबदल्यात व प्रलंबित बिल काढण्यासाठी माझेकडे 1,28,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती आधी 28 हजार रूपये व नंतर आणखीन 5 हजार रूपये असे एकुण 33 हजार रूपये कमी करून 95,000/- रूपये लाचेची मागणी
मागणी केली आहे. तरी ग्रामविकास अधिकारी श्रीमती कदम व चौगुले त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी. अशा

आशयाची हकीकत सांगितल्याने तसा त्यांचा सविस्तर जबाब दोन्ही पंचांसमक्ष नोंदविण्यात आला आहे.
तरी दि. 17/06/2026 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेविका श्रीमती वर्षा शंकर कदम, ग्रामविकास अधिकारी व शरद दत्तात्रय चौगुले, क्लार्क, ग्रामपंचायत कार्यालय, गुंडेवाडी यांनी आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून तक्रारदार यांचे ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी येथे लागणारे आवश्यक साहित्य पुरविलेचे बिल काढलेचे मोबदल्यात व प्रलंबित बिल काढण्यासाठी, लोकसेविका श्रीमती वर्षा शंकर कदम, ग्रामविकास अधिकारी यांनी स्वत: करीता व लोकसेवक शरद दत्तात्रय चौगुले, क्लार्क यांनी स्वत:करीता व ग्रामविकास अधिकारी यांचेकरीता तक्रारदार यांचेकडे 1,28,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती आधी 28 हजार रूपये व नंतर आणखीन 5 हजार रूपये असे एकुण 33 हजार रूपये कमी करून 95,000/- रूपये लाचेची मागणी करून स्वत:चा आर्थिक फायदा मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणुन माझी लोकसेविका श्रीमती वर्षा शंकर कदम, वय-40 वर्षे, पद- ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी ता.मिरज जि.सांगली रा.खटाव ता.मिरज जि.सांगली व लोकसेवक श्री. शरद दत्तात्रय चौगुले, वय-40 वर्षे, पद- क्लार्क, रा. सिध्देवाडी खंडेराजुरी रोड, पाटील वस्ती, गं◌ुडेवाडी ता.मिरज जि.सांगली, ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी ता.मिरज जि.सांगली यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा 1988 (सुधारणा 2018) चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो पिं◌्रट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
SOMNATH VASANT WAGH(I (Inspector)) / 151010004025VWM8201N **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

पोलीस स्टेशन ऑफिसर

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SOMNATH VASANT \
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 15101000402SVWM82(

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**